पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ब क्षेत्रिय कार्यालय प्रशासन विभाग
क्र. बक्षेका/प्रशा/१/कावि/ 1223 /२०२३
दिनांक 2 /१०/२०२३

विषय- वर्ग ३ व ४ गणवेश देय कर्मचा-यांनी गणवेश परिधान करणेबाबत...

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिके अंतर्गत ब क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत कार्यरत आहे. मा. आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र. प्रशासन/तप/कावि/११३/२००९ दि. १८/०२/२००९ नुसार ज्या वर्ग ३ व ४ चे कर्मचारी यांना महानगरपालिकेकडून गणवेश रोख रक्कम तसेच धुलाई भत्ता देणेत येतो अशा महापालिका कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत विहित केलेला गणवेश परिधान बंधनकारक आहे. कार्यालयाकडे कर्मचारी गणवेश परिधान करित नसलेबाबत लेखी तक्रार ई-मेल व्दारे प्राप्त झालेली आहे. यावरुन असे निदर्शनास येत आहे की वेळोवेळी सुचना देऊनही वर्ग ३ व ४ चे गणवेश देय कर्मचारी कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेने विहित केलेला गणवेश परिधान करित नसलेच येते. सदरची बाब कार्यालयीन शिस्तीस धरुन नाही.

सबब मी, क्षेत्रिय अधिकारी ब क्षेत्रिय कार्यालय या परिपत्रकाव्दारे वर्ग ३ व ४ चे गणवेश देय कर्मचा-यांनी महानगरपालिकेने विहित केलेला गणवेश नियमित कार्यालयीन वेळेत परिधान करावा. अन्यथा उक्त परिपत्रकातील मा. आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार कारवाई करणेत येईल. ब क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत कार्यरत असलेले सर्व विभागाचे शाखा प्रमुखांनी त्यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेले वर्ग ३ व ४ गणवेश देय कर्मचारी यांनी गणवेश परिधान करित नसल्याचे निदर्शनास आल्यास उक्त परिपत्रकातील निर्देशानुसार कारवाई करणेत यावी. तसेच या कार्यालयाकडे पुनश्च अशा तक्रारी प्राप्त होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(अमित पंडित)
क्षेत्रिय अधिकारी
ब क्षेत्रिय कार्यालय
चिंचवड-३३

प्रति- संबधित शाखाप्रमुख, ब क्षेत्रिय कार्यालय

२/- सदरचे परिपत्रक सर्व संबधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घेणेत यावी. त्यांची प्रत या कार्यालयास पाठविणेत यावी.

प्रत- सामान्य प्रशासन विभाग, पिं.चि. मनपा पिंपरी-१८